**नि. फौ.ख .नं. ४७/२०२४**

म. सरकार वि. अभिजीत संभाजी पाटील

**निशाण नं. १०/क**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१</u>**

| | |
|---|---|
| नाव | – आप्पासो बबन पवार |
| वय | – ३७ वर्षे |
| व्यवसाय | – नोकरी उप विभागीय अधिकारी |
| पत्ता | – कोल्हापूर जि. कोल्हापूर |

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती एस. एस. गर्जे यांचेतर्फे शपथेवर सुरु,</u>**

१.दि. ११.०६.२०२४ रोजी मी शाहुवाडी उप विभागीय पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत होतो. सदरची घटना दि. २८.०९.२०२३ रोजी घडली होती. महाराणा प्रताप तरुण मंडळ कोडोली यांना गणेशउत्सोव साजरा करणे तसेच त्यावेळी जर ध्वनी प्रदूषण कायद्याचे उल्लंघन झाले तर तुमच्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल याबाबतही सांगण्यात आले होते. त्यावेळी आम्ही गणेशोत्सवा दरम्यान पी.एस.आय नरेंद्र बाजीराव पाटील यांच्या हाताखाली पोलीस अंमलदार के.पी.पाटील यांच्यासह एक टीम तयार केली होती. त्या टीमला आम्ही काम नेमून दिले होते ते असे होते की, सदर टीमने ज्या भागातून नागरिकांच्या तक्रारी आल्या आहेत त्या ठिकाणी जावून पाहणी करणे आणि जर ध्वनी प्रदूषण कायद्याचे उल्लंघन होत असेल त्याबाबत खात्री करून घेणे. दि. २८.०९.२०२३ रोजी सदर टीमने स्टेशन डायरीला नोंद केली त्यानंतर त्यांनी मंडळ ज्या भागात स्थापन करण्यात आलेले आहेत तसेच ज्या भागातून मिरवणूक निघणार आहेत त्या ठिकाणी पाहणी करायला सुरुवात केली. त्यावेळी आमच्या टीमने दुपारी ०४.३० वाजता यंत्राच्या सहाय्याने

दोन पंचासमक्ष सामन्य ध्वनी तीव्रता (Control Sample)पंचनामा केला. त्यावेळी शंकर यशवंत पाटील पोलीस पाटील तसेच माळवी हे दुसरे पंच होते. आता मला दाखविण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यावर पी.एस.आय पाटील तसेच दोन पंच यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे बरोबर आहे.

२. त्यावेळी ध्वनी मापक यंत्रामध्ये त्याची मोजमापे घेवून त्यानुसार त्याची प्रिंट काढण्यात आली. त्यावर पंचाच्या सहया घेण्यात आल्या. सदरची प्रिंट या कामी जोडण्यात आली आहे.

३. त्यानंतर जेव्हा मिरवणुकीला सुरुवात झाली त्यावेळी अंदाजे रात्री २२.५० वाजण्याच्या दरम्याने स्टेशन डायरीला एंट्री करून पी.एस.आय नरेंद्र पाटील यांची टीम त्या ठिकाणी पाठविण्यात आली. सदरची मिरवणूक ही कोडोली येथील मुख्य मिरवणूक मार्गाने काढण्यात येत होती. त्या ठिकाणी गेल्यानंतर त्यांनी महाराणा प्रताप मंडळ यांचे समोर विशिष्ट अंतरावर उभे राहून दोन पंचासमक्ष पुन्हा ध्वनी मापक यंत्राने आवाजाची तीव्रता मोजली. त्या टीमने सोबत यंत्र नेलेले होते. ती तीव्रता त्यांना १०९.०५ डेसीबल एवढी आढळून आली. त्यावेळी ध्वनी मापक यंत्रामध्ये त्याची मोजमापे घेवून त्यानुसार त्याची प्रिंट काढण्यात आली. त्यावर पंचाच्या सहया घेण्यात आल्या. सदरची प्रिंट या कामी जोडण्यात आली आहे. त्यावर पुन्हा पंचनामा करून पंचाच्या सहया घेण्यात आल्या. सदरची प्रत ही मशीनवरून प्रिंट काढण्यात आलेली आहे. त्या पंचनाम्याची प्रत मंडळाचे अध्यक्ष यांना देण्याकरिता विचारले असता त्यांनी त्यास नकार दिला. त्यानंतर याबाबतचा प्रस्ताव करून तयार करून संबंधित मंडळाच्या अध्यक्ष आरोपी त्यांचे म्हणणे सादर करण्याकरिता नोटीस देण्यात आली. परंतु आरोपी यांनी त्यानंतरच्या ६० दिवसात नोटीसीला उत्तर दिले नाही. याबाबत त्यांचे काहीही म्हणणे नाही असे कायद्यानुसार समजून मला प्राप्त अधिकारानुसार संबंधित आरोपी यांचेविरुद्ध मी गुन्हा दाखल केला.

४. ध्वनी मापक यंत्राबाबतचे प्रमाणपत्र या कामी जोडण्यात आलेले आहे. तसेच सदर यंत्र वापरण्याकरिता विशिष्ट प्रशिक्षण घ्यावे लागते त्या प्रशिक्षण घेतल्याबाबतचे अंमलदार के. पी. पाटील यांचे प्रमाणपत्र देखील मी या कामी जोडलेले आहे. कोडोली मुख्य मिरवणूक मार्गाच्या आजूबाजूस लोकांची वस्ती आहे. लोकांना सदरच्या आवाजापासून त्रास होत असल्याचे आमच्या निदर्शनास आले होते.

५. त्यानंतर संपूर्ण प्रकरणाबाबत माहिती व कागदपत्रे घेवून मी सदरची फिर्यादी दाखल केली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझ्या माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ११** देण्यात येत आहे. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकणार नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. आर. एच. पाटील यांचेमार्फत सुरु,**

६.माझी नेमणूक ही महराष्ट्र शासनाकडून होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद दाखल करणेपूर्वी मी पर्यावरण संरक्षण कायदा कलम १५ व १९ यांचे काळजीपूर्वक अवलोकन केले आहे. प्रस्तुत फिर्याद मी महाराष्ट्र ध्वनीप्रदूषण विनयमन व नियंत्रण नियमावली २००० च्या कलम २ (क) अन्वये दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरची फिर्याद दाखल करण्याचा अधिकार हा फक्त केंद्र शासन यांना आहे. हे म्हणणे खरे आहे की, तशी नेमणूक झाल्याबाबतचे पत्र मी या कामात दाखल केलेले नाही.

प्रश्न – केंद्र शासनाने सदर तक्रार दाखल करण्याबाबत तुम्हाला कोणते अधिकार दिलेले नाहीत त्याबाबतचा कोणताही कागद तुम्ही या कामी हजर केलेला नाही ?

उत्तर – महाराष्ट्र ध्वनीप्रदूषण विनयमन व नियंत्रण नियमावली २००० च्या कलम २ (क) अन्वये नुसार मला अधिकार प्राप्त झालेले आहेत व त्यानुसार सदरची फिर्याद दाखल केलेली आहे.

७. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांना ६० दिवसांची नोटीस दिली होती हे दाखविण्याकरिता मी कोणताही कागद हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तशा पद्धतीची कोणतीही नोटीस आरोपींना तुम्ही दिलेली व त्यांना ती पोहोच देखील झालेली नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, टीम पाठवून कार्यवाही केल्याबाबतची मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरची फिर्याद ही मी अप्रत्यक्षरित्या पाहणी न करता दाखल केलेली आहे. कोडोली हे गाव माझे माहिती प्रमाणे अंदाजे ३० ते ३५ हजार लोकवस्तीचे आहे. सन २०२३ मध्ये आम्ही ४० ते ५० गणेशोत्सव मंडळांना परवानगी दिल्या होत्या. घटनेदिवशी मिरवणूक संध्याकाळी ६ वाजता सुरु करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, मिरवणूक सुरु होण्यापूर्वी तसा नमूना पंचनामा करण्यात आलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, नमुना पंचनामा प्रकरणातील झेरॉक्स प्रत या कामी हजर केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तशी मूळ प्रत जोडायला आम्हाला कोणतीही अडचण नव्हती.

९. प्रस्तुत घटनेदिवशी मिरवणूक मार्गावर अंदाजे ४० ते ५० विर्सजन करण्याकरिता एका मागोमाग चालत असतात. हे म्हणणे खरे आहे की, त्या मिरवणुकीमध्ये ट्रॅक्टर, गाडया टू व्हीलर आणि पाहणारे लोक हे देखील होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी आतिषबाजी तसेच घोषणाबाजी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी वर वर्णन केलेले डेसीबल हे मिरवणुकीच्या दरम्यान तपासण्यात आलेले होते.

१०. हे म्हणणे खरे आहे की, ध्वनी मापक यंत्रावर मोजणी करतेवेळी तेथे उपस्थित असणाराा सर्व ध्वनी हा त्या यत्रांमध्ये दिसून येतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी इतर उपस्थित असणाऱ्या सर्व मंडळांचा आवाज बंद करून फक्त आरोपी यांच्या मंडळाचा आवाज यंत्रावर घेण्यात आला असे घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यांचेकडे स्वतःच्या मालकीचे वाद्य नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, तपासादरम्यान सदरचे डॉल्बी सिस्टीम ही कोणाच्या मालकीची होती याबाबत लक्षात आलेले नाही. सदर मिरवणुकी दरम्यान सर्व मंडळांचे डॉल्बी सिस्टीम जप्त करण्या एवढे पोलीस बळ उपलब्ध नसल्यामुळे संबंधित डॉल्बी सिस्टीम जप्त करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी कोणताही डॉल्बी लावला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी कथन करत असलेले डेसीबल हे चुकीचे आहे.

११. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत ध्वनी प्रदूषण होत असल्याबाबत लेखी तक्रार आली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ येथे लोकांची राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटनेदिवशी ठराविक अंतरावर उभे राहून कोणताही पंचनामा करण्यात आलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी या कामी हजर केलेल्या प्रिंटवर महाराष्ट्र स्टेट पोलीस असे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची प्रत ही त्या मशीनमधून प्रिंट काढण्यात आली होती. सदरचे मशीन हे आम्ही नाशिक येथून घेतलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची प्रिंट ही हाताने तयार करण्यात आलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे ध्वनी मापक यंत्र हे संगणकासारखे यंत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत भारतीय पुरावा कायदा कलम ६५ – ब नुसार या कामी मी दाखला दाखल केलेला नाही.

१२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी कोणताही डॉल्बी लावलेला नसताना मुद्दामहून त्यांचे विरुद्ध खोटी फिर्याद दाखल करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी सरतपासात खोटया व चुकीच्या गोष्टी सांगितलेल्या आहेत.

हे म्हणणे खरे आहे की, मशीन याचे मॉडेल नंबर आणि सिरियल नंबर मी या प्रकरणात दाखल केलेल्या प्रमाणपत्र व प्रिंट यांच्याशी साम्य होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, एका कागदात मॉडेल नंबर सी.आर ५१८ असा आहे तर टेस्ट रिपोर्ट मध्ये त्याचा क्रमांक ए.इ.आय २३००० असा दिसून येत आहे. तसेच दाखल कागदपत्रामधील सिरियल नंबर ७९२८८ असा आहे तर दुसऱ्या कागदामध्ये सी. २३२६ के १६ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्या ध्वनी मापक यंत्राने आवाजाची पातळी मोजली त्याबाबतचे तपशील हे मी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये आढळून येत नाहीत.

१३. हे म्हणणे खरे आहे की, गणपती मंडळांना परवानगी ही त्या भागातील संबंधित पोलीस ठाणे यांचेकडून दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, संबंधित गणेश मंडळाला परवानगी दिल्याबाबतचे पत्र मी या कामी हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीस वरती तसा पोहोचल्याचा शेरा अथवा सही दिसून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला कोडोली येथील छत्रपती शिवाजी चौक माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे चार रस्ते एकत्र येतात. हे म्हणणे खरे आहे की, गावातील गणपती मंडळे ही चौकामध्ये एकत्र येतात व त्यानंतर प्रशासनाने आखून दिलेल्या मार्गाने जातात. हे म्हणणे खरे आहे की, चौकामध्ये एकावेळीला एक मंडळ येते. हे म्हणणे खरे आहे की, गावातील मुख्य चौक असल्यामुळे तेथे लोकांची गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, गणेशत्सोवाचा आनंद घेण्याकरिता तसेच मिरवणुक पाहण्याकरिता तेथे लोक जमलेले असतात. हे म्हणणे खरे आहे की, सदर चौकामध्ये ते मंडळ अंदाजे १० ते १५ मिनीटे थांबून खेळ, वाद्य व इतर गणेशत्सोवाचे कार्यक्रम तेथे करून तेथून पुढे ते मंडळ मार्गक्रमण करतात. हे म्हणणे खरे आहे की, घटनेदिवशी एक एक मंडळ चौकात येत होते कार्यक्रम करून तेथून पुढे मार्गक्रमण करत होते.

१४. सदर पंचनामे हे आमच्या टीमने हे २२.३० ते २३.५० या कालावधीत केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी हजर केलेल्या मूळ प्रिंटमधील सर्व मजकूर भरलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या मूळ प्रतीवरती वाहन क्रमांक व सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व प्रिंट या एकाच मशीनवरून काढण्यात आलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मशीनवरून निघणाऱ्या प्रिंटमधील मजकूर हा सारखाच असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या प्रकरणांमध्ये यंत्राची प्रिंट व तसेच यंत्रामध्ये तफावत नाही. हे म्हणणे खरे आहे की, संबंधित डॉल्बी सिस्टीम बाबतचा तपशीलवार मजकूर यामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरची डॉल्बी सिस्टीम हे कोणत्या व्यक्तीची होती हे पंचनाम्यामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, ध्वनी पातळी ओलांडणारे कोणतेही वाद्य आरोपी यांनी वापरलेले नसल्यामुळे सदर आरापी विरुद्ध मी खोटी तक्रार दाखल केलेली आहे.

१५. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यास नोटीस मी दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्याही प्रकारची नोटीस आरोपीला आम्ही दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वरीष्ठांना चांगले काम करून दाखविण्याच्या हेतूने प्रस्तुत प्रकरणात कोणतेही पंचनामे न करता तसेच ध्वनी मापक यंत्राने मोजणी न करता तसेच कोणतीही नोटीस न देता केवळ आरोपी यांना त्रास देण्याच्या हेतूने प्रस्तुत आरोपींविरुद्ध मी फिर्याद दाखल केलेली आहे.

१६. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२३ मध्ये अंदाजे १५० मंडळांना परवानगया देण्यात आलेल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, अंदाजे ३५० च्या दरम्याने कोडोली गावात मंडळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की,गणपती मंडळांना परवानगी देण्यापूर्वी त्यांच्याकडील वादयांची आम्ही नोंद घेत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा करण्यामध्ये कोडोली गावातील स्थानिक पंच घेण्यात आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, स्थानिक पंच घेण्यास आम्हांला अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत

प्रकरणामध्ये कोडोली गावातील साक्षीदार घेण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटना ही सन २०२३ मध्ये घडला व त्याबाबतची फिर्याद मी सन २०२४ मध्ये दाखल केलेली आहे.

१७. हे म्हणणे खरे आहे की, कोडोली येथील मुख्य मिरवणूक मार्गावर अनेक मंडळे असलेमुळे त्यांची वेगवेगळी वादय, वाहने, जमा असलेले लोक व इतर गोष्टींचा गोंगाट असतो.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. ११.०७.२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा